दै. प्रजावाणी दि. १२।०१।२५

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने शोधले

# सहा वर्षापासून बेपत्ता असलेल्या मुलाचा शोध

प्रतिनिधी • नांदेड



कधी घरातील व्यक्तीने रागावले म्हणून, कधी अभ्यासाचा ताण तर काहीजण घरगुती तसेच अन्य कारणावरून रागाच्या भरात घर सोडतात. त्यात घर सोडणारे अल्पवयीन असतील तर त्यांना शोधून काढणे पोलीस विभागातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाला एक प्रकारचे आव्हान ठरते. दरम्यान, गेल्या सहा वर्षापासून घर सोडलेल्या एका मुलाचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. यापूर्वी देखील एका मुलाला ओरिसामधून शोधण्यात यश मिळाले होते. काही जणांचा शोध लागत असला तरी बऱ्याच जणांचा ठावठिकाणा मिळत नसल्याने पालक व पोलिसांसाठी चिंतेची बाब बनल्या जाते.

काही वर्षापूर्वी पंधरा वर्षे वय असताना घरगुती कारणावरून अंकुश याने घर सोडून मुंबई गाठली. जीवाची मुंबई करत असतानाच तो तेथील पोलिसांच्या तावडीत सापडला मुंबई पोलिसांनी त्याला नाव, गाव विचारून नांदेडच्या सुधारगृहात आणून सोडले. काही दिवसानंतर अंकुशने तेथूनही पळ काढून परत मुंबईला गेला. या प्रकरणी संबंधित सुधारगृहाच्या वतीने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञाता विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या आठ वर्षापासून तो पोलीस दप्तरी बेपत्ता होता. याच कालावधीत अंकुशने मिस्त्रीचे काम शिकून तेच उदरनिर्वाहाचे साधन बनवले. याच कालावधीत त्याने लग्नही केले.

दरम्यान, हरवलेल्या आणि अपहरण झालेल्या मुलाचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाच्या वतीने शोध सुरू असताना सात आठ वर्षापूर्वी बेपत्ता असलेला अंकुश हा मुंबईतील उल्हासनगर भागात असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सुधीर खोडवे व त्यांच्या पथकाला मिळाली. या पथकाने विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या मदतीने शोध घेतला असता मिळून आला. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक उपय खंडेराय, सपोनि संजय डी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोउपनि सुधीर खोडवे यांनी केले